ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*




# VIDYAWARTA

## *Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

## Interdisciplinary National Conference on

## Recent Trends in Social Sciences & Commerce



27th February 2018

# COMMERCE AND ECONOMICS

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Scanned with OKEN Scanner

# Index

## Economics


| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Economics of Demonetisation | Muhammed Jamsheer.P | 1 |
| 2 | Advantage and Disadvantage of GST | Dr. Ramnath Baburao Sangule | 5 |
| 3 | मानव विकास निर्देशांक | प्रा. डॉ. बांगर भागिनाथ कुंडलीकराव | 8 |
| 4 | मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक | लक्ष्मण निळकंठ येवले<br>प्रा. डॉ. शिवाजी भ. यादव | 13 |
| 5 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ.शिवराज रामराव पाटील | 15 |
| 6 | Skill Development and Its Challenges in India | Ms. Anuja Prabhakar Mudholkar | 18 |
| 7 | विमुद्रीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | किशोर बी.मेंढे | 23 |
| 8 | वस्तु व सेवा कर - संरचना व प्रभाव | प्रा.राहुल तागडे | 26 |
| 9 | GST : An Overview | Asst. Prof. Shelke Madan Laxman | 29 |
| 10 | मानव विकास निर्देशांक | प्रा. केंद्रे बी. एस. | 32 |
| 11 | Goods and Services Tax (GST) | Dr. Malshikare Ashok Bhaurao | 35 |
| 12 | चलन निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | श्रीमती डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर<br>प्रा. शिंदे अमोल सिताराम | 41 |
| 13 | वस्तू व सेवा करः स्वरूप आणि वैशिष्ट्ये | डॉ. संजय काळे | 44 |
| 14 | जीएसटी - सरंचना व प्रभाव, एक विश्लेषन | प्रा. प्रविण पी. राऊत | 47 |
| 15 | एक देश - एक कर 'वस्तू व सेवा कर' | डॉ. वायसे शामराव भगवान | 51 |
| 16 | थेट विदेशी गुंतवणूक आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे अध्ययन | वैशाली लक्ष्मण कोष्टी | 54 |
| 17 | भारतातील कररचना आणि वस्तू सेवा कर | प्रा.लवंगे शिवाजी बी.<br>डॉ. कोरडे अशोक मा. | 60 |
| 18 | भारतातील विदेशी थेट प्रत्यक्ष गुंतवणूक : एक दृष्टीक्षेप | विजय भुजंगराव मांटे | 62 |
| 19 | A Study of Human Development of De-notified and Nomadic Tribes in Marathwada Region | Tidke Atish Sarangdhar | 66 |


Scanned with OKEN Scanner

# चलन निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

श्रीमती डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर
अर्थशास्त्र प्रमुख विभाग
शि.म.ज्ञा.मो.महाविद्यालय कळंब.
जि.उस्मानाबाद

प्रा. शिंदे अमोल सिताराम
अर्थशास्त्र विभाग
शि.म.ज्ञा.मो.महाविद्यालय कळंब.
जि.उस्मानाबाद

**प्रस्तावना:**

भारत हा विकसनशील देश म्हणून ओळखला जातो या देशात जगाच्या १७ टक्के लोकसंख्या राहते तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न अतिशय कमी आहे विशेष म्हणजे सध्याच्य काळात सुद्धा ५२ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्राता कार्यरत आहे. देशामध्ये गरीबी. दारिद्य, बेरोजगारी इत्यादी समस्या देशासमोर असताना काळा पैसा विदेशातून येणाऱ्या नकली चलनी नोटांचा प्रसार व वापर रोखण्यसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्वाचा व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून म्हणजे ९ नोव्हेंबरचा दिवस सुरू झाल्यापासून चलनातून पाचशे हजार रूपयांच्या नोट चलनातून बंद करण्यात आल्या आहेत. यावेळी बोलताना मोर्दीनी स्पष्ट केले की, प्रामाणिकपणे पैसे कमवणाऱ्यांना घाबरण्याचे काहीच कारण नही. त्यांचा पैसा सुरक्षित आहे. व तो सुरक्षीतच राहीलं. तसेच काळा पैसा,भ्रष्टाचार बनावट नोटा व तो सुरक्षीतच राहील. तसेच काळा पैसा, भ्रष्टाचार बनावट नोटा व दहशतवाद राक्षसांना थोपवता येईल. गेल्या अडीच वर्षात १.२५ लाख कोटी रूपयाचा काळा पैसा बाहेर काढण्यात आला आहे.

प्रो. अरूण शास्त्री हे नामांकित अर्थतज्ञ असून ते गेल्या ३५ वर्षापासून काळयापैशावर अभ्यास करीत आहे. त्यांचे ब्लॅक इकोनोमी इन इंडिया हे पुस्तक प्रत्येक अर्थशास्त्रासाठी बायबल आहे. ते म्हणतात, ८ नोव्हेंबर २०१६ च्या अगोदर ४ लाख कोटीच्या आसपास चलन जमा होते. त्यानंतर २ डिसेंबर २०१६ पर्यंत बँकाकडे ९ लाख कोटि जुन्या नोटांच्या रूपात जमा झाले आहेत. म्हणून एकूण १३ लाख कोटि व्यवस्थेतून रोख चलना निघून गेले आहेत. भारतात आतापर्यंत कॅशलेस व्यवहार ३ टक्के होता. तो जरी सरकारने प्रयत्न करून १५ टक्के पर्यंत वाढविला तरी पुढील १० महिन्यांपर्यंत शेतकऱ्यांचे, मजूरवर्गाचे, लहान दुकान दाराचे तसेच लहान उद्योगधंदे बंदे पडून खूप नुकसान होईल.

निश्चलनीकरणामुळे लोकांची पैसे खर्च करण्याची शैली जीवनशैली यात बदल होणार असून प्रामाणिक सरकारचा प्रयत्न आहे. येणाऱ्या दिवसांमध्ये पॅनकार्ड आधारकार्ड आणि निवडणूक कार्डावर जास्तीत जास्त पेमेंट होणारा असल्याने सरकारला या निर्णयामुळे अनाधिकृत व्यवहारांना आळा बसेल आणि मोठया प्रमाणात व्यवहार हे अधिकृत होऊ लागतील. यामुळे रिअल इस्टेट, उच्च शिक्षण आणि आरोग्य सेवा सर्वसामान्य जनतेला परवडू शकतील. काळया पैशाविरोधात आणखी कठोर पावले उचलत सरकारने बॅंकेत अडीच लाख रूपयांपेक्षा अधिक रोख रक्कम भरताना या उत्पन्नाचा स्त्रोत बेकायदेशीर आढळल्यास प्राप्तीकरासह आणखी २०० टक्के दंड म्हणून आकारण्यात येणार आहे.

**निश्चलनीकरणाचा अर्थ:**

निश्चलनीकरण म्हणजे वस्तूंची देवाण-घेवाण रोख रकमेशिवाय करणे म्हणजे निश्चलनीकरण होय.

निश्चलनीकरणामध्ये पैशाची देवाण-घेवाणा फक्त कार्ड, चेक, डीडी, नेटबॅंकिंग, फोन बॅंकिंग ई-वॅलेट इत्यादी गोष्टींनी व्यवहार करणे. कारण पैसा ही वस्तू नाही किंवा पैसा ही साठवून ठेवण्याची गोष्ट नसून तो एक विनियोग किंवा हस्तांतर करण्याचे एक साधन आहे. त्याच्यावर फक्त सरकारचा हक्क आहे व असतो.

निश्चलनीकरणाच्या प्रक्रियेतून अर्थव्यवस्थेचे अधिकाधिक डिजिटलीकरण होत आहे हेच निश्चलीकरणाचे उद्दिष्टे आहे. सरकारचा हेतू काळा पैसा बाहेर काढणे हा आहे. पण त्याचबरोबर लोकांनी स्मार्टफोनचा वापर करावा त्यामुळे रोकडरहित अर्थव्यवस्थेची वाट सुकर केली जाईल असा विश्वास केंद्रीय उदयोग व वाणिज्यमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केला.

निश्चलनीकरण म्हणजे सर्व आर्थिक व्यवहारांची देवाण-घेवाण कोणत्याही रोकराकमेशिवाय करणे म्हणजे निश्चलनीकरण होय. या युगात अद्यावत टेक्नॉलॉजीच्या साहाय्याने ही अशक्य गोष्ट शक्य झाली आहे. या निश्चलनीकरण प्रक्रियेमुळे अनावश्यक खर्चाला चाप लागल्यामुळे व नोटा टंचाईमुळे नजीकच्या काळात लोकांची खर्च करण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे. अर्थव्यवस्थेत मागणी घटल्याने किमती कमी होतील याचा परिणाम महागाई कमी होऊन आर बी आय ला अपेक्षीत असलेल्या पटयात राहील. त्यामुळे येत्या काळात आर बी आय ला व्याज दरात मोठया प्रमाणात कपात करणे भाग आहे.



Scanned with OKEN Scanner

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१) निश्चलनीकरणाच्या संकल्पनेचा समग्र अभ्यास करणे.

२) निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचे स्वरूप जानून घेणे.

३) भारतीय जनतेच्या निश्चलनीकरण विषयीच्या प्रतिक्रीया जाणून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन अहवालमध्ये वेगवेगळी तथ्य संकलीत करत असताना व त्या तथ्याचे निर्वाचन आणि विश्लेषण वैज्ञानिक पध्दतीने करून निष्कर्ष काढावे लागतात. उपरोक्त संशोधन अधिकाधिक वस्तुनिष्ठ बनविण्यासाठी संशोधकाने येथे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

**निश्चलीकरणाचे फायदे-तोटे**

क्रयशक्तीचा विचार करता आपण जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहेत व अर्थव्यवस्थेच्य आकाराचा विचारा करता आपण सातव्या स्थानी आहोत निश्चलनीकरणामुळे रोखीने व नोंद नसलेल्या व्यवहारांना चाप बसेल व सरकारच महसूल वाढेल. तसेच निश्चलीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर काही चांगले वाईट परिणाम होणार आहेत. झाले आहे. किंवा निश्चलनीकरणाचे काही फायदे व तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**फायदे:**

१) निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेचा चांगलाच फ़ायदा होईल.कारण ग्राहकांची क्रयाशक्ती मंदावल्यामुळे नजीकच्या काळात अर्थव्यवस्था आकुंचली तरी भविष्यात अर्थव्यवस्थेला नक्कीच फायदा होणार आहे.

२) निश्चलनीकरणामुळे अर्थव्यवस्थेतील भ्रष्टाचाराला संपूर्णपणे आळा बसेल.

३) निश्चलनीकरणामुळे नोटा छापवण्यासाठी लागणाऱ्या करोडो रुपयाची बचत होईल.

४) देशातील आंतकवादी आणि नक्षलवादी यांना चाप बसेल.

५) काळा पैसा तयारच होणार नाही.

६) राजकीय पक्ष , रियल इस्टेट , ज्वेलर्स व इतर व्यवसायामध्ये गुंतवणारा पैसा पुर्णपणे थांबला जाईल.

७) निश्चलनीकारणामुळे अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त करप्रणाली सुटसुटीत होऊन बॅकिंगसारखे पर्यात उपलब्ध होतील.

८) काळ्या पैशांसाठी असणारे सर्व अवैध धंदे बंद होतील.

९) निवडणूका पैशाच्या जीवावर न होता खऱ्याखुऱ्या या बौध्दिक क्षमतेवर होतील.

१०) रोखीने व नोंद नसलेल्या व्यवहारांना चाप बसेल.

११) निश्चलनीकरणाने मंदावलेल्या मागणीचा सुखद परिणाम किरकोळ महागाई दर ४ टक्के खाली येईल. ८ नोव्हेंबर लागू झालेल्या निश्चलनीकरणामुळे यंदा हा दर अधिक प्रमाणात खाली आला आहे.

१२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५०० व १००० रुपयांच्या बंदी घातल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला सुमारे ३०० कोटी रुपयांचा फायदा होण्याची शक्यता आहे.

**निश्चलनीकरणाचे तोटे:**

निश्चलीकरणाचे फायदे ज्याप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला होणारा आहेत त्याचप्रमाणे काही तोटे भारतीय अर्थव्यवस्थेला सहन करावे लागतील निश्चलनीकरणाचे तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) निश्चलनीकरणाचा फटका देशातील सेवा क्षेत्राला बसला असून नोव्हेंबरमधील या क्षेत्राची वाढ गेल्या तीन वर्षांच्या तळात विसावली आहे. निक्केई इंडिया सेवा खरेदी व्यवस्थापक निर्देशांक हा देशातील सेवा क्षेत्रातील हा देशातील सेवा क्षेत्रातील कामगिरी तपासतो. मासिक तुलनेत नोंदला जाणारा हा निर्देशक आक्टोबर मधील ५४.५ वरुन थेट ४६.७ टक्के पर्यत खाली आला. ५० टक्के खालील हा निर्देशांक सेवा क्षेत्राबाबत चिंता व्यक्त करणारा आहे.

२) निश्चलनीकरणाने चालू आर्थिक वर्षात देशाच्या आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होईल. २०१६-१७ मध्ये देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन ७ टक्के असेल. असे आंतरराष्ट्रीय बॅकेने अंदाजले आहे.

३) ८ नोंव्हेबरपासून देशात लागू झालेल्या निश्चलनीकरणाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर अल्प कालावधीसाठी विपरीत परिणाम जाणवेल असे अशियाई विकास बॅकेने म्हटले आहे.



Scanned with OKEN Scanner

४) रोकडवरील व्यवहारावर अधिकतर अवलंबून असलेल्या देशातील व मध्यम उद्योगांवर निश्चलीकरणाचा विपरित परिणाम अधिक जाणवेल असे आंतरराष्ट्रीय बँकेने म्हटले आहे.

५) निश्चलनीकरणाचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागातील आठवडी बाजारावर झालेला आहे. कारण प्रत्येक व्यापारी शेतकरी हा रोखीने व्यवहार करतो. तो मशीन वापर शकत नाही.

६) निश्चलनीकरणामुळे फायदा कमी व तोटा जास्त झालेला आहे. पुढील ६ महिन्यात नोटबंदीमुळे अर्थव्यवस्थेत कमीत कमी ३ लाख कोटींचे नुकसान होणार आहे.

**निष्कर्ष:**

१) देशामध्ये आतापर्यंत कॅशलेश व्यवहार ३ टक्के होता तो जरी सरकारने प्रयत्न करून १५ टक्के पर्यंत वाढविला तरी पुढील १० महिन्यांपर्यंत शेतकऱ्याचे , मजूर वर्गाचे , लहान दुकानदाराचे खूप नुकसान होणार आहे.

२) सरकारने केलेल्या निश्चलीकरणामुळे काळा पैसा रोखणे, खोट्या नोटा काढणे हे उद्देश फेल झाल्याचे दिसून येत आहे.

३) डिंसेबर नंतरही काळा पैसा तयार होतच राहील असा अंदाज आहे.

४) सरकारचा खोट्या नोटा संपतील हा दावा फेल ठरेल.

५) सरकारने लोकांना आवश्यक सुविधा देऊन भ्रष्टाचार विरुध्द विश्वास संपादन केला तर भारतीय लोक कॅशलेश व्यवस्थेशिवायही खुशीने टॅक्स देतील.

६) निश्चलनीकरणामुळे सध्याच्या काळात अर्थव्यवस्थेचा वेग कमी झाला असला तरी भविष्यात अर्थव्यस्थेचा फायदा होईल.

७) काळ्या पैशासंबंधी असणारे सर्व अवैध धंदे बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

८) निश्चलनीकरणामुळे काही प्रमाणात का होईना भ्रष्टाचार कमी होतील.

**सारांश:**

निश्चलनीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर चांगले - वाईट परिणाम दिसून आलेले आहेत. मोठ्या नोटा अंशतः रद्द केल्या गेल्याच्या निमित्ताने अर्थकारणावर देशभर जो जागर सुरु झाला आहे. तो सर्व भारतीय नागरिकांना खरे आर्थिक स्वातंत्र मिळाल्याशिवाय म्हणजे एक रक्तविहिन अर्थक्रांती झाल्याशिवाय आता थांबणार नाही. हा निर्णय यशस्वी होऊन देश पुढे जावा. ही सदीच्छा.

**संदर्भ ग्रंथ:**

१) चाणक्य मंडल डिसेंबर २०१६ अविनाश धर्माधिकारी

२) लोकसत्ता पेपर २ डिसेंबर २०१६ अर्थसत्ता

३) लोकसत्ता पेपर १२ डिसेंबर २०१६

४) लोकसत्ता पेपर १३ नोव्हेंबर २०१६

५) लोकसत्ता पेपर १३ डिसेंबर २०१६ अर्थसत्ता

६) आर्थिक व सामाजिक विकास - डॉ. किरण जी. देसले

७) Black Economy in India – Prof. Arun Shastri.